दै. सकाळ दि.09.03.25

# महिला पोलिसांची मोटारसायकल रॅली उत्साहात

## महिला दिनानिमित्त विशेष उपक्रम, बेटी बचाओ, बेटी पढाओ उपक्रमास दहा वर्षे पूर्ण

सकाळ वृत्तसेवा

नांदेड, ता. ८ : जागतिक महिला दिनानिमित्त जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या संकल्पनेतून बेटी बचाओ, बेटी पढाओ या उपक्रमाच्या १० वर्ष पूर्ती निमित्त नांदेड पोलिस दलाच्या वतीने शनिवारी सकाळी पोलिस अधीक्षक कार्यालय ते महात्मा फुले यांचा पुतळा आयटीआय चौक पर्यंत मोटरसायकल रॅली काढण्यात आली.

या रॅलीला उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी जगताप यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली.

या रॅलीत जिल्ह्यातील महिला पोलिस अधिकारी आणि महिला पोलिस अंमलदार यांची उपस्थिती होती. ही मोटार सायकल रॅली पोलिस अधीक्षक कार्यालय, कलामंदिर, शिंवाजीनगर, मार्गे आयटीआय चौक येथे आल्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून समारोप करण्यात आला.

या रॅलीमध्ये उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप, अरूणा सुगावे, स्नेहा पिंपरखेडे, माया भोसले, जयश्री गिरे, अश्विनी गायकवाड, नमिता देशमुख यांच्यासह महिला अंमलदार सहभागी झाल्या होत्या.



नांदेड : जागतिक महिला दिनानिमित्त पोलीस दलाच्या वतीने महिला पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या मोटारसायकल रॅली चे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. यावेळी हेल्मेट धारण करून महिला अधिकारी, कर्मचारी सहभागी झाल्या होत्या.